MHSN030003852026

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४४/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश</u>**
**<u>(महाराष्ट्र शासन वि शुभम माणिक कदम)</u>**

अर्ज व त्यावरील सरकारपक्षाचे व आरोपीचे म्हणणे वाचले. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ८४ प्रमाणे सांगली शहर पोलिस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. १३४/२०२३ दाखल आहे. सदर गुन्हयाचा दिनांक ०९.०८.२०२३ असा आहे. फेरिस्तचे अवलोकन करता दिनांक १२.०३.२०२३ रोजी सन २०२३ मध्येच तपास पुर्ण झाल्याचे दिसून येते. तपासी अंमलदार यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना निवडणुक बंदोबस्त व दैनंदिन कामकाज व वरिष्ठांनी वेळोवेळी मागवलेल्या माहितीमुळे दोषारोपपत्र दाखल करण्यास दोन वर्षे एक महिन्याचा विलंब झालेला आहे व सदरचा विलंब माफ करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

२. सरकारी वकीलांनी त्यांच्या म्हणण्यात विलंब माफी विषयची कथने संयुक्तिक असून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. तर आरोपीने अर्जास विरोध केला आहे. आरोपीच्या म्हणण्याप्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यास दोन वर्षे नऊ महिने इतका विलंब झाला आहे. विलंबाचे कारण हे पटण्याजोगे नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. सदर विलंबाच्या अनुषंगाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४६८ (२) चे अवलोकन करता असे दिसून येते की, ज्या गुन्हयाला केवळ दंडाची शिक्षा आहे अशा गुन्हयात सहा महिन्याच्या कालावधीत दखल घेणे आवश्यक

आहे. त्यानुसार सदरचे दोषारोपपत्र वेळेत दाखल करणे आवश्यक आहे. अर्जात नमूद केलेला विलंब संयुक्तिक नाही व दैनंदिन कामकाजामुळे दोषारोपपत्र मुदतील दाखल करता आले नाही ही बाब पटण्याजोगे नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश परित करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

VEDVATI ANIRUDHA ADYA
Digitally signed by VEDVATI ANIRUDHA ADYA
Date: 2026.03.07 17:43:44 +0530

सांगली. (वेदवती अनिरुध्द आदय)
दिनांक – ०७.०३.२०२६ ३ रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : A.P. Patil (Grade-3)
Court : V.A Adya, J.M.F.C. Court No.3, Sangli.
Date : 07.03.2026
Order signed by the
Presiding officer on : 07.03.2026
Order uploaded on : 07.03.2026